भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८
अंतर्गत अभियोग दाखल करण्यास
मंजूरी देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

## शासन निर्णय क्रमांकः अभियो-१३१२/प्र.क्र.३०/पुर्नबांधित-१/११अ

मंत्रालय, मुंबई -४०००३२

दिनांक: १२ फेब्रुवारी, २०१३.

**संदर्भ —**

1. **शा.नि. सा.प्र.वि. सीडीआर १०९९/प्र.क्र.६२/९९/११अ, दि.३/४/२०००**
2. **शा.नि. सा.प्र.वि. सीडीआर १०९९/प्र.क्र.६२/९९/११अ, दि.१६/३/२००१**
3. **शा.प. सा.प्र.वि. सीडीआर १००२/प्र.क्र.१७/०२/११अ, दि.१२/८/२००२**
4. **शा.नि. सा.प्र.वि. अंभियो १००६/प्र.क्र.११/०६/११अ, दि.२३/७/२००७**
5. **शा.नि. सा.प्र.वि. अंभियो १३०८/प्र.क्र.३४/०८/११अ, दि.४/७/२००९**
6. **शा.नि. सा.प्र.वि. अंभियो १३११/प्र.क्र.८८/११अ, दि.३०/८/२०११**

**प्रस्तावना —**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ खाली अभियोग दाखल करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्वमंजूरीकरिता प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासनाने वेळोवेळी सूचना दिल्या आहेत. या सर्व शासन निर्णयांचे पुनर्विलोकन करून, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अभियोग दाखल करण्यास मंजुरी देण्यासाठी प्राप्त होणाऱ्या प्रकरणात अनुसरण्यात यावयाच्या कार्यपध्दतीबद्दल सर्वकष आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय —

आता, या संदर्भातील, वर नमूद केलेले सर्व शासन निर्णय **<u>अधिक्रमित करून</u>** भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अंतर्गत लोकसेवकांविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यासाठी मंजुरी प्राप्त करण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून प्राप्त प्रकरणी खालील प्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे :-

**(१) सक्षम <u>प्राधिकारी</u>**

भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम १९ खाली खटला दाखल करण्यासाठी कोणाची पूर्वमंजुरी आवश्यक आहे याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यानुसार, अ) राज्याच्या व्यवहाराशी संबंधित सेवेमध्ये असलेल्या व राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय सेवेतून काढून टाकता न येणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत त्या शासनाची, ब) इतर कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत त्याला त्याच्या पदावरुन काढून टाकण्याबाबत सक्षम असलेल्या प्राधिकरणाची पूर्वमंजूरी असल्याशिवाय, न्यायालय अपराधाची दखल घेणार नाही, अशी तरतूद आहे. ही तरतूद लक्षात घेता,

अ) (I) पोलीस सेवेतील पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त या पदावर व त्यावरील पदांवर कार्यरत अधिकारी (ज्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ लागू आहेत) यांच्या विरुद्ध अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी पुढीलप्रमाणे असतील :-

| | | |
|---|---|---|
| i | राजपत्रित गट -अ {ज्यांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु. १०,६५०/- (असुधारीत) आहे, त्या किंवा त्यापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन घेणारे अधिकारी} | संबंधित प्रशासकीय विभागाने विभागाचे प्रभारी मंत्री यांचे मार्फत मा. मुख्यमंत्री यांची मान्यता घ्यावी. |
| ii | राजपत्रित गट-अ {ज्यांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.१०,६५०/- (असुधारीत) पेक्षा कमी आहे असे अधिकारी} | संबंधित प्रशासकीय विभागाने विभागाचे प्रभारी मंत्री यांची मान्यता घ्यावी. |

अ) (II) पोलीस सेवेतील पोलीस निरीक्षक या पदावर व त्यापेक्षा कमी दर्जाच्या पदावरील अधिकारी / कर्मचारी (ज्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ लागू नाहीत) यांच्या विरुद्ध अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी पुढीलप्रमाणे असतील :-

| अ.क्र. | पदनाम | सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक<br>गट “अ” (राजपत्रित) | पोलीस महासंचालक |
| २ | सहायक पोलीस निरीक्षक,<br>गट “ब” (राजपत्रित) | विशेष पोलीस महानिरीक्षक किंवा त्यापेक्षा वरील दर्जाचा अधिकारी |
| ३ | पोलीस उप निरीक्षक,<br>गट “ब” (अराजपत्रित) | पोलीस उप महानिरीक्षक किंवा त्यापेक्षा वरील दर्जाचा अधिकारी |
| ४ | सहायक पोलीस उप निरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई | पोलीस अधीक्षक/पोलीस उप आयुक्त किंवा त्यापेक्षा वरील दर्जाचा अधिकारी |

ब) शासकीय सेवेतील इतर अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुद्ध अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी पुढीलप्रमाणे असतील :-

| | | |
|---|---|---|
| i | राजपत्रित गट -अ {ज्यांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु. १०,६५०/- (असुधारीत) आहे, त्या किंवा त्यापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन घेणारे अधिकारी} | संबंधित प्रशासकीय विभागाने विभागाचे प्रभारी मंत्री यांचे मार्फत मा. मुख्यमंत्री यांची मान्यता घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| ii | राजपत्रित गट-अ {ज्यांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.१०,६५०/- (असुधारीत) पेक्षा कमी आहे असे अधिकारी} व राजपत्रित गट -ब | संबंधित प्रशासकीय विभागाने विभागाचे प्रभारी मंत्री यांची मान्यता घ्यावी. |
| iii | अराजपत्रित गट ब, गट-क व गट -ड | यथास्थिती विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांची मान्यता घ्यावी. |
| iv | ज्यांना शासनाकडून अर्थसहाय्य देण्यात येते अशा अन्य संस्थामधील (उदा. महामंडळे/ मंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था) शासकीय अधिकारी / कर्मचारी. | संबंधित संस्थांचे अध्यक्ष, संचालक इत्यादी किंवा विशिष्ट आदेशाद्वारे सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आला आहे असा कोणताही अधिकारी यांची मान्यता घ्यावी. संबंधित संस्थांच्या अध्यक्ष, संचालकांचे पद रिक्त असल्यास अशा परिस्थितीत सक्षम प्राधिकारी कोण असतील हे संबंधित विभागाने शासन आदेशाद्वारे विहित करावे. |

(२) <u>लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने प्रस्ताव सादर करताना अवलंबावयाची कार्यपध्दती.</u>

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हे पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी असतात. यामुळे, प्रस्तावावर जलद गतीने निर्णय होण्याच्या दृष्टीने महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या मान्यतेने संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द अभियोग दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव गृह विभागामार्फत पाठविण्याऐवजी थेट संबंधित प्रशासकीय विभागाकडे मान्यतेकरिता सादर करावा व त्याची प्रत गृह विभागाकडे पाठवावी. गृह विभागाने त्यांच्याकडे प्राप्त प्रस्तावांची प्रत देखील संबंधित प्रशासकीय विभागाकडे आवश्यक कार्यवाहीकरीता पाठवावी.

**(३) एकाच प्रकरणात एकापेक्षा अधिक अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्यास अशा प्रकरणी पुढीप्रमाणे कार्यपध्दती अनुसरण्यात यावी :-**

**अ)** एकाच विभागाचे गट-अ ते गट-ड मधील अधिकारी / कर्मचारी अपचारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एकत्रित प्रस्ताव सादर करावा व संबंधित प्रशासकीय विभागाने एकत्रित मंजुरी आदेश निर्गमित करावेत.

**ब)** एकापेक्षा अधिक विभागातील गट-अ ते गट-ड मधील अधिकारी / कर्मचारी अपचारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने प्रशासकीय विभागवार स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत व संबंधित प्रशासकीय विभागांनी स्वतंत्र मंजूरी आदेश निर्गमित करावेत.

**क)** क्षेत्रिय स्तरावरील एकापेक्षा अधिक विभागातील गट-अ ते गट-ड मधील कर्मचारी अपचारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत व संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी स्वतंत्र मंजूरी आदेश निर्गमित करावेत.

**ड)** अन्य प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून संबंधीत नियुक्ती प्राधिकारीनिहाय प्रस्ताव परस्पर सक्षम प्राधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावेत..

**(४) प्रशासकीय विभागांनी करावयाची कार्यवाही :-**

**अ)** भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत अभियोग दाखल करण्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मसुदा दोषारोप पत्रासह (Draft Charge sheet) प्रशासकीय विभागात प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित प्रशासकीय विभागाने प्राप्त कागदपत्रांची विस्तृत छाननी करावी. प्रस्तावाची छाननी केल्यानंतर अभियोग दाखल करण्यास अनुमती देण्यास योग्य प्रस्ताव असल्याचे (Fit) विभागाचे मत असल्यास, असा प्रस्ताव **विधी व न्याय विभागाकडे संदर्भ न करता,** थेट सक्षम प्राधिकारी यांचेसमोर जाणीवपूर्वक निर्णयासाठी (**Taking decision by application of mind**) सादर करावा.

**ब)** लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त प्रस्तावाची प्रशासकीय विभागाच्या स्तरावर सविस्तर छाननी केल्यानंतर अभियोग दाखल करण्यास अनुमती देण्यात येऊ नये असे विभागाचे मत असल्यास, किंवा अनुमती द्यावी किंवा देऊ नये याबाबत संबंधित विभाग निश्चित मत बनवू शकत नसेल, अशी प्रकरणे प्रथम विधी व न्याय विभागाकडे सादर करावीत व त्या विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन घेतल्यानंतर ती प्रकरणे सक्षम प्राधिकारी यांच्यासमोर त्या प्रकरणात अभियोग दाखल करणे किंवा दाखल न करणे यासंदर्भातील उचित जाणीवपूर्वक निर्णयासाठी (**Taking decision by application of mind**) सादर करावीत.

**क)** उपरोक्त (अ) व (ब) च्या अनुषंगाने ज्या प्रकरणात अभियोग दाखल करण्यास अनुमती देण्याचा निर्णय सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावर होईल, अशा सर्व प्रकरणात शासकीय विधी विषयक कामकाजाचे नियम, १९८४ (**Rules for the Conduct of Legal Affairs of Government, १९८४**) च्या नियम १० मधील तरतूदीनुसार मंजूरी आदेश (**Sanction Order**) प्रधान सचिव व विधी परामर्शी यांच्याकडे तपासणीसाठी पाठवावेत.

**ड)** अशाप्रकारे सक्षम प्राधिकारी व विधी व न्याय विभाग यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासन कार्यनियमावलीतील क्र.१३ मधील तरतूदीनुसार अशा मंजूरीबाबतचे आदेश योग्य त्या सक्षम अधिकाऱ्यांच्या सहीने निर्गमित करण्यात यावेत.

**(५) प्रस्तावावरील कार्यवाहीचे वेळापत्रक :-**

**अ)** लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा प्रकरणी घटना घडल्यानंतर ३ महिन्यांच्या आत तपासाचा अंतिम अहवाल अभियोग प्रस्तावासह व मसुदा दोषारोप पत्रासह (Draft charge sheet) तसेच, संबंधित कागदपत्रांसह संबंधितांकडे सादर करावा. अन्य प्रकरणात देखील (जसे अपसंपदा वगैरे) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने असे प्रस्ताव हे ३ महिन्यांच्या कालावधीत सादर करावेत.

**ब)** घटना घडल्यानंतर वरीलप्रमाणे ३ महिन्यांच्या कालावधीत अभियोग दाखल करण्याचा प्रस्ताव संबंधितांकडे पाठविणे शक्य झाले नाही तर अशा प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक

विभागातील संबधित अधिकाऱ्यांनी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्याकडून ३ महिन्यांची मुदतवाढ घ्यावी व शक्यतो या वाढीव मुदतीतच मसुदा दोषारोप पत्रासह (Draft charge sheet) अभियोग दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांच्याकडे सादर करावा.

**क)** ज्या प्रकरणात अशा प्रकारे घटना घडल्यानंतर ६ महिन्यांच्या कालावधीत मसुदा दोषारोप पत्रासह अभियोग दाखल करण्याचा प्रस्ताव सादर होऊ शकणार नाही अशा प्रकरणांचा अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या स्तरावर तिमाही किंवा सहामाही आढावा घेण्यात यावा व त्यामधील अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

**ड)** लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अभियोग दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर अशा प्रस्तावावर विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यासह सक्षम प्राधिकाऱ्याची ३ महिन्यांच्या कालावधीत मंजूरी मिळविण्यात यावी व मंजूरी देण्यासंदर्भातील किंवा नाकारण्या संदर्भातील आदेश **३ महिन्यांच्या कालावधीतच निर्गमित करण्यात यावेत.**

**इ)** हा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकास जी प्रकरणे वेगवेगळ्या स्तरावर अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्यासंदर्भात प्रलंबित असतील अशी सर्व प्रकरणे या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या कालावधीत निकाली काढली जातील म्हणजेच त्यावर अभियोग दाखल करण्यास मंजूरी देणे किंवा नाकारणे याबाबतचा निर्णय घेतला जाईल, अशी कार्यवाही संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी पूर्ण करावी.

**फ)** ज्या प्रकरणात सक्षम प्राधिकारी अभियोग दाखल करण्याच्या प्रस्तावास अनुमती नाकारतील अशा प्रकरणातील त्यांची मंजूरी नाकारणारे आदेश त्याबाबतच्या कारणमिमांसेसह त्यांच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्यास ७ दिवसांच्या आत माहितीसाठी सादर करतील. (उदा.ज्या प्रकरणातील सचिवांच्या स्तरावर अभियोग दाखल करण्यास मंजूरी नाकारली असेल अशा प्रकरणातील आदेश मुख्य सचिवांना पाठविण्यात येतील. तर ज्या प्रकरणात प्रभारी मंत्री यांच्या स्तरावर

अभियोग दाखल करण्यास अनुमती नाकारण्याचा निर्णय होईल, अशा प्रकरणातील आदेश त्याबाबतच्या कारणमिमांसेसह त्यांचे वरिष्ठ म्हणून मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पाठविण्यात यावेत.)

**ग)** प्रत्येक महिन्यास मंत्रालयातील सर्व विभागीय सचिवांनी त्यांच्या विभागाअंतर्गत (खुद्द व विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयांसह) **३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी अभियोग दाखल करण्यास मंजूरीबाबत प्रलंबित प्रकरणाचे प्रमाणपत्र अशा प्रकरणी प्रलंबित राहण्याचे कारण व ते कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे त्यासह मुख्य सचिव यांच्याकडे सादर करावे.**

**ह)** क्षेत्रिय स्तरावर गट-क व ड च्या कर्मचाऱ्यांबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग किंवा गृह विभाग किंवा प्रशासकीय विभागाकडून त्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव **प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या कालावधीत सक्षम प्राधिकारी यांनी निर्णय घ्यावा** व त्याबाबतचे सकारात्मक किंवा नकारात्मक आदेश कारणांसह निर्गमित करावेत.

**य)** क्षेत्रिय स्तरावर ज्या प्रकरणात अभियोग दाखल करण्याचे नाकारण्याचा निर्णय होईल, अशा प्रकरणातील परवानगी नाकारणारे आदेश त्याबाबतच्या निर्णयासह संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांना **७ दिवसांच्या कालावधीत माहितीसाठी पाठविण्यात यावेत. तसेच, अभियोग दाखल करण्याबाबतच्या प्रलंबित प्रकरणाबाबतचा अहवाल देखील प्रशासकीय विभागाच्या सचिवांकडे पाठवावा.**

(६) **अभियोग दाखल करण्यास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर करावयाची कार्यवाही :-**

**अ)** अभियोग दाखल करण्यास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शक्यतो एका महिन्याच्या आत सक्षम न्यायालयात अभियोग दाखल करावेत.

**ब)** अशी मंजूरी प्राप्त झालेल्या प्रकरणांचा महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी त्यांच्या स्तरावर दरमहा आढावा घ्यावा व त्यामधील अडचणींचे निराकरण करावे.

**क)** हा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकास अभियोग दाखल करण्यास मंजूरी मिळालेली जी प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यासाठी प्रलंबित असतील, अशा सर्व प्रकरणात या शासन

निर्णयाच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या कालावधीत न्यायालयात अभियोग दाखल होईल, असे पहावे.

(७) **संनियंत्रण समिती :-**

अ) **प्रशासकीय विभागाच्या स्तरावरील संनियंत्रण समिती :-**

संबंधित मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील गट-क व ड मधील कर्मचाऱ्यांविरुद्ध अभियोग दाखल करण्याच्या प्रस्तावासंदर्भात करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत व ज्या प्रकरणांमध्ये अभियोग दाखल करण्यास विलंब होत असेल अशा प्रकरणासंदर्भात संनियंत्रणासाठी संबंधित विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील खालीलप्रमाणे संनियंत्रण समिती गठीत करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित मंत्रालयीन विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | संबंधित मंत्रालयीन विभागाअंतर्गत ज्या कार्यालयामधील प्रकरणे प्रलंबित असतील त्या कार्यालयाचे विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख | सदस्य |
| ३ | संबंधित मंत्रालयीन विभागाचे सह/उप सचिव (आस्थापना) | सदस्य-सचिव |

ब) **मंत्रालयीन स्तरावरील संनियंत्रण समिती :-**

गट-अ व ब मधील अधिकाऱ्यांविरुद्ध अभियोग दाखल करण्याबाबतच्या प्रलंबित प्रकरणाबाबतचे संनियंत्रण करण्यासाठी राज्य स्तरावर खालीलप्रमाणे संनियंत्रण समिती गठीत करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव (गृह) | सह अध्यक्ष |
| ३ | महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (सेवा), सा.प्र.वि. | सदस्य |
| ६ | संबंधित विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव | सदस्य |

मंत्रालय स्तरावरील संनियंत्रण समितीसमोर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही गृह विभागामार्फत करण्यात यावी.

**क)** वरील दोन्ही संनियंत्रण समित्या ह्या संबंधित प्रकरण कोणत्या टप्प्यावर व कोणत्या कारणासाठी प्रलंबित आहे याबाबत वेळोवेळी आढावा घेतील व त्यासंदर्भातील पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभागांना मार्गदर्शन करतील. संबंधित विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव या मार्गदर्शनाच्या आधारे प्रलंबित असलेली प्रकरणे लवकरात लवकर निर्णयासाठी सक्षम प्राधिकारी यांच्याकडे सादर करतील.

**(८) शासकीय सेवकांच्या सेवा पंच-साक्षीदार म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून लाचेचा सापळा किंवा घरझडतीच्या कामासाठी योग्य शासकीय सेवकांच्या सेवा पंच-साक्षीदार म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत किंवा अन्य सहकार्यासाठी विनंती करण्यात आल्यास अशा प्रकरणी त्वरीत सहकार्य दिले जाईल याची दक्षता विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखांनी घ्यावी.

**(९) न्यायालयात अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्याबरोबरच करावयाची इतर कार्यवाही**

**अ)** विभागीय चौकशी नियम पुस्तिका (चौथी आवृत्ती), १९९१ मधील परिच्छेद ४.२ मध्ये फौजदारी कार्यवाहीच्या तुलनेत विभागीय कारवाई करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. सदर सूचनांचा पुनरुच्चार शासन परिपत्रक सा.प्र.वि. सीडीआर १०९७/ प्र.क्र.४६/९७/११, दि.१८/११/१९९७ अन्वये करण्यात आलेला आहे. फौजदारी खटला दाखल केला असला तरीही विभागीय चौकशी आदेशित करता येऊ शकते. फौजदारी खटल्याचा निर्णय लागण्यास बराच कालावधी लागतो व त्यामुळे संबंधितांवर तात्काळ कारवाई करणे शक्य होत नाही. विभागीय चौकशी नियम पुस्तिकेतील परिच्छेद ४.२ खालील तिसऱ्या पर्यायानुसार फौजदारी खटला भरण्याबरोबरच संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या विरूध्द विभागीय चौकशी चालू करण्यासंदर्भात (चालू करावी किंवा आवश्यकता नाही) शिस्तभंग विषयक प्राधिकारी यांच्या स्तरावर जाणीव पूर्वक निर्णय घेण्यात यावा.

**ब)** संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या विरूध्द विभागीय चौकशी सुरु न करण्याचा जाणीव पूर्वक निर्णय सक्षम प्राधिकाऱ्याने घेतला असल्यास त्याबाबतची समर्पक कारणे नमूद करण्यात यावीत.

**क)** लाचेचा सापळा प्रकरणी (मानीव निलंबन वगळता) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपचारी अधिकारी / कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्यांनी करावी.

(१०) क्षेत्रिय स्तरावर व संबंधित प्रशासकीय विभाग तसेच, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून वर विहित पद्धतीनुसार व वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी व विलंब टाळण्यात यावा.

**हा शासन निर्णय गृह विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०२१३१३१००४८१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BAKSHI KALYANESHWAR P

Digitally signed by BAKSHI KALYANESHWAR P
DN: CN = BAKSHI KALYANESHWAR P, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = GAD
Reason: I am the author of this document
Date: 2013.02.13 17:27:50 +05'30'

**(के. पी. बक्षी)**

प्रधान सचिव (सेवा)

सामान्य प्रशासन विभाग

प्रत,

१. राज्यपाल यांचे सचिव

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

४. उपमुख्यमंत्री यांचे सचिव

५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

६. अपर मुख्य सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई

७. प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग

८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग

९. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव

१०. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक

११. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

१२. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई

१३. *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई

१४. *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

१५. *सचिव, महाराष्ट्र विधान सभा सचिवालय, मुंबई

१६. *सचिव, महाराष्ट्र विधान परिषद सचिवालय, मुंबई

१७. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

१८. सर्व मंत्रालयीन विभाग

१९. मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख

२०. सामान्य प्रशासन विभागातील सर्व प्रशासकीय कार्यासने

२१. निवडनस्ती